# योजनेचे नाव :- राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. २ (सुधारित )

**१) योजनेचे उद्दिष्ट :-** ग्रामीण भागातील दरिद्रिंय रेषेवरील पंरतु अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना घरकुल बांधकामासाठी आर्थीक सहाय्य कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन देणे.

**२) योजनेचे स्वरुपः-**

१) प्रति घरकुल बांधकाम खर्च - रु. १,००,०००/-

२) लाभार्थीचा स्वतःचा सहभाग - रु. १०,०००/-

३) लाभार्थीने बँकाक डून प्राप्त करुन घ्यावयाची व स्वतःपरतफेड करावयाची कर्जाची रक्कम - रु. ९०,०००/-

४) व्याज परत फेडीचा कालावधी - १० वर्ष

५) कर्ज परत फेडीचा मासीक हप्ता - रु. ८३३ प्रति महिना

६) लाभधारकांनी घरकुल बांधण्यासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या परत फेडीच्या हमीपोटी लाभधारकांला त्यांचे घरकुल त्याखालील जमिनीसह संबंधीत बँकेकडे तारण गहाण ठेवावे लागेल.

७) कर्जावरील व्याजाची रक्कम राज्य शासन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा मार्फत भेटेल.

८) या योजनेतील लाभार्थीने स्वतःच्या जागेवर किंवा शासनाने /ग्रामपंचायतीने त्याला उपलब्ध करुन दिलेल्या जमिनीवर किमान २६९ चौ. फुट चढई क्षेत्राचे घरकुल स्वतः बांधायचे आहे.

९) ज्या लाभधारकाक डे घरकुल बांधण्यासाठी स्वतःची जागा नसेल, अशा पात्र लाभधारकाला गावठाणाची/ग्रामपंचायतीची अथवा शासनाची जमीन उपलब्ध असल्यास त्यामधून ७५० चौ. फुट क्षेत्रफळाचा भूखंड संबंधीत यंत्रणेकडून विनामुल्य मंजूर करण्यात येईल.

**३) अटी व शर्ती :-**

१) कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न रु. ९६,०००/- पेक्षा जास्त नसल्याचा दाखला.

२) घरकुलासाठी प्रस्तावित केलेली जागा बोजारहित असावी व तसे प्रमाणपत्र तहसिलदार पेक्षा कमी नसलेल्या सक्षम अधिकारी कडून प्राप्त करुन घ्यावे.

३) लाभार्थीचा स्वतःचा भूखंड असावा.

४) ग्राम सभेत लाभार्थीचे नाव मंजूर असणे आवश्यक आहे.

५) ग्राम सभेचे ठरावासह प्रस्ताव पंचायत समितीकडे गेल्यावर पात्रतेबद्दल तपसणी केली जाईल.

६) लाभार्थीने स्वत: घराचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

७) बँकेकडून मंजूर केलेल्या कर्जाच्या परतफेडीचा बँक ठरवून देईल, त्या रक्कमेचा हप्ता नियमितपणे बँकेत जमा करावा. लाभधारकाने कर्जाच्या परतफेडीच्या कार्यवाहीत कुचरई केल्यास व

संबंधीत बँकेने त्यांच्या नियमानुसार कर्ज वसूलीसाठी कारवाई केल्यास त्यास लाभधारक स्वत: जबाबदार राहील.

८) लाभधारकाने कर्ज परतफेड करण्यास दिरंगाई केल्यास व त्या कारणासाठी बँकेने लाभधारकावर नियमानुसार कोणतीही दंडनिय अटकारणी केल्यास अशी कोणतीही रक्कम शासनाकडून भरली

जाणार नाही.

**४) आवश्यक कागदपत्रे :-**

१) ग्राम सभेचा ठराव.

२) जमिण बोजारहित असल्याचे प्रमाणपत्र

३) जातीचे प्रमाणपत्र

४) उत्पन्नाचा दाखला

५) जमिनिचा ७/१२, नमुना ८

६) अंदाजपत्रक

**५) संपर्क पत्ता:-**

१) खंडविकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व.